# INNOVASSYNTH INVESTMENTS LIMITED

Regd. office : Flat No.: C-2/3, KMC No.91, Innovassynth Colony,
Khopoli - 410203, Raigad, Maharashtra India.
CIN : L67120MH2008PLC178923

Tel.:+91-2192- 260224
Fax : +91-2192-263628

Website :www.innovassynthinvestments.in
E-mail : secretarial@innovassynthinvestments.in

Date: 07th July 2020

To,
Manager,
Corporate Relationship Department,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai-400001

Scrip Code: 533315

Dear Sir/Madam,

**Sub: Newspaper Advertisement**

Please find enclosed copies of newspaper advertisement regarding Financial Results for quarter and year ended 31st March 2020 as published in Business Standard and Tarun Bharat on July 7, 2020.

Kindly take the above on your records and acknowledge receipt.

Thanking You,

Yours Faithfully,

For **Innovassynth Investments Limited**

INNOVASSYNTH INVESTMENTS LIMITED KHOPOLI

**Abhishek Deshpande**
Company Secretary & Compliance Officer

# ‘कोरोना’च्या साथीला मलेरिया, डेंग्यू

## मुंबईत २० हजारांहून जास्त ठिकाणे नष्ट

## डास नियंत्रणासाठी पालिकेची मोहीम




**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** कोरोनामुळे मुंबईकर मेटाकुटीस आले असताना त्याच्या जोडीला आता मलेरिया आणि डेंग्यू पसरू पाहत आहे. मात्र, साथीचे आजार पसरू नये म्हणून पालिकेने कंबर कसली असून जून महिन्यात राबविलेल्या मोहिमेत विविध ठिकाणची डेंग्यू, मलेरियाची तब्बल २० हजार, १९४ ठिकाणे नष्ट केली. या आधी जानेवारी ते मे महिन्यापर्यंत राबवलेल्या मोहिमेत १ लाख, ८ हजार, २६ वस्तू हटवून संभाव्य धोका कमी केला होता.

मुंबईत पावसाळ्याच्या तोंडावर डेंग्यू, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांना आळा बसावा व त्यांच्या प्रसाराला प्रतिबंध व्हावा, यासाठी डासांची ठिकाणे शोधून ती नष्ट केली जातात. यासाठी मुंबईभर मुंबई महापालिकेचा कीटकनाशक विभाग ही मोहीम नियमितपणे राबवत असतो. यावेळी कोरोना आणि त्याचवेळी पावसाळा असल्यामुळे डेंग्यू, मलेरिया यासारखे आजार निर्माण होऊ नये, यासाठी विविध ठिकाणच्या विहिरी, पाण्याच्या टाक्या, तरण तलाव अशी एकूण १ लाख, ७२ हजार, ५७२ ठिकाणे तपासून त्यातील मलेरिया पसरवणारी ४ हजार, ६०१ ठिकाणे नष्ट करण्यात आली. डेंग्यूच्या संभाव्य अळ्या सापडणारी पाण्याची पिंपे, टायर, ऑड आर्टिकल, पेट्री लेट्स, फेंगशुई आणि मनी प्लांटची झाडे अशी एकूण ५३ लाख, ९२ हजार, ७५४ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. त्यात १५ हजार, ५९३ डेंग्यूच्या अळ्यांची ठिकाणे सापडली. ती नष्ट करण्यात आली.

### पाणी साचू देऊ नका!

अनेक गगनचुंबी इमारतींमध्ये डेंग्यूच्या अळ्या सापडल्या आहेत. अनेक झोपडपट्ट्यांमध्ये पाण्याची पिंप भरून ठेवलेली आहेत. लोक गावी गेल्यामुळे या पिंपांमध्ये डेंग्यूच्या अळ्या मोठ्या प्रमाणात सापडल्या आहेत. पावसाळ्यात छपरावरील प्लास्टिक/टारपोलिनवर पाणी साचते. तिथे तसेच आवारात, गच्चीवर किंवा आजुबाजूच्या परिसरात पाणी साचून राहिल्यामुळे डेंग्यू, मलेरियाचा प्रसार होऊ शकतो. त्या पार्श्वभूमीवर, घरात आणि घराबाहेरील भांड्याकुंड्यामध्ये पाणी साचणार नाही, याची काळजी घ्या, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेने केले आहे.

## थोडक्यात

### देवस्थाने व मंदिरे तातडीने उघडण्याची मंगलप्रभात लोढांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**मुंबई** : कोरोना ‘लॉकडाऊन मध्ये बंद केलेली सर्व मंदिरे तातडीने उघडण्याची मागणी आज भाजप मुंबईचे अध्यक्ष आमदार मंगलप्रभात लोढा यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे.

मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात मंगलप्रभात लोढा म्हणतात की, ‘‘राज्यात ‘मिशन बिगीन अगेन’ सुरू झाले आहे. त्याअंतर्गत बाजारपेठ काही निर्बंधांसह पुन्हा हळूहळू सुरू होत आहेत. त्याचबरोबर राज्यात आणि शहरांत बस वाहतूक सुरू केली आहे. प्रसारमाध्यमांत आलेल्या बातम्यांनुसार सरकार लवकरच हॉटेल आणि उपाहारगृहे सुरू करण्यास परवानगी देत आहे.भारतीय समाज देवाधर्माशी जोडला गेला आहे. आजच्या संकट काळात या समाजाला मानसिक धार्मिक आधार मिळण्याची गरज आहे. त्यामुळे लोकांसाठी बंद केलेली सर्व मंदिरे तातडीने सामाजिक अंतराचे ध्यान राखत खुली केली गेली पाहिजेत,’’ अशी मागणी मंगलप्रभात लोढा यांनी केली आहे.

### ‘महाविकास आघाडी’ सरकारविरोधात शनिवारी ‘रिपब्लिकन’ पक्षाचे राज्यभर निषेध आंदोलन



**मुंबई** : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्यात दलित आणि बौद्धांवर अत्याचार वाढत आहेत. ‘लॉकडाऊन’च्या काळातही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दलितांवर हल्ले झाल्याचे, घरे जाळल्याचे, दलित बौद्ध तरुणांच्या हत्या झाल्याचे निषेधार्ह प्रकार घडले आहेत. दलित आणि बौद्धांवर वाढत असलेले अत्याचार रोखण्याकडे राज्य सरकार अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. बौद्ध आणि दलितांवरील अत्याचार वाढत असताना ते रोखण्यात महाविकास आघाडी सरकार अपयशी ठरले आहे. दलित आणि बौद्धांना संरक्षण देण्याच्या मागणीसाठी तसेच दलित आणि बौद्धांवरील अत्याचारांच्या निषेधार्थ येत्या शनिवारी दि.११ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्यांवर रिपब्लिकन पक्षाच्यावतीने रस्त्यावर उतरून तीव्र निषेध आंदोलन करण्यात येणार आहे, अशी अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. हे निषेध आंदोलन ‘सोशल डिस्टन्स’चे नियम पाळून आणि मास्क घालून करण्याची सूचना रिपब्लिकन कार्यकर्त्यांना दिली असून आंदोलन करताना गर्दी न करण्याची सूचनाही देण्यात आली आहे, असे आठवले यांनी सांगितले आहे.

### ‘उबर’चे मुंबईतील कार्यालय बंद, सेवा सुरूच

**मुंबई** : कोरोनाच्या संकटामुळे व्यवसायावर परिणाम होत असल्याने ‘उबर’ या ॲपवर आधारित टॅक्सीसेवा पुरवणाऱ्या कंपनीने मुंबईतील कार्यालय बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, मुंबईकरांसाठी राईड-शेअरिंग सेवा सुरू राहणार आहे, असे कंपनीकडून सांगण्यात आले. ‘उबर’ कंपनीचे मुंबईत कुर्ला येथे कार्यालय आहे. ‘उबर’च्या मुंबई कार्यालयात सुमारे २५ कायमस्वरुपी कर्मचारी आणि १५० पेक्षा जास्त कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीने मुंबईतील कार्यालय बंद करताना कर्मचाऱ्यांना डिसेंबरपर्यंत घरातूनच काम करण्यासाठी सांगितले आहे. मात्र, कंपनीने कार्यालय बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे त्यांच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांना पुढील वर्षी मुंबईत इतर कोणत्या कार्यालयात पाठवणार की नाही याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मात्र, कंपनी मुंबईमध्ये आपली सेवा सुरूच ठेवणार आहे.

## ‘कोरोना’बाधितांमध्ये ‘जी-नॉर्थ’ दुसऱ्या क्रमांकावर



**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीत रुग्णसंख्या घटत असली तरी या भागाचा समावेश असलेला ‘जी-नॉर्थ’ विभाग रुग्णसंख्येत दुसऱ्या क्रमांकावर आहे. ‘के ईस्ट’ (अंधेरी-विलेपार्ले) विभाग पहिल्या क्रमांकावर आहे.

‘के-ईस्ट’मध्ये ५,६६० कोरोनाबाधित असून ३,०५६ बरे झाले आहेत, तर ३५१ जणांचा मृत्यू झाला आहे. २,२५३ रुग्ण आजही उपचार घेत आहेत. त्या खालोखाल धारावीचा समावेश असलेल्या ‘जी-नॉर्थ’मध्ये ५,१५६ कोरोनाबाधित असून ३,५७२ रुग्ण बरे झाले आहेत, तर ३७९ जणांचा मृत्यू झाला आहे. १,२०५ रुग्ण आजही ॲक्टिव्ह आहेत. ‘के-ईस्ट’मध्ये अंधेरी-जोगेश्वरीचा परिसर येत असला तरी झोपड्यांबरोबर येथे चाळीही आहेत. उत्तुंग इमारती आहेत. मात्र, येथे रुग्णांचे प्रमाण जास्त असून रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ‘जी-नॉर्थ’पेक्षा कमी आहे. ‘के’ईस्टमध्ये ३०५६ रुग्ण बरे झाले आहेत, तर ‘जी-नॉर्थ’मध्ये ३,५७२ रुग्ण बरे झाले आहेत. धारावीसारखी आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असूनही येथे रुग्ण बरे होण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे हे वाखाणण्याजोगे आहे.

सध्या धारावीत रुग्णसंख्या आटोक्यात येत आहे, पण माहीम-दादरमध्ये ती कमी होत नाही. रविवारच्या आकडेवारीनुसार, दादर येथे १६ रुग्ण सापडले असून तेथील रुग्णसंख्या ९५६ झाली आहे. तेथे ५३४ जणांना डिस्चार्ज देण्यात आला असून अजून ३९७ रुग्ण उपचार घेत आहेत म्हणजे दाट लोकवस्तीच्या धारावीत रुग्णसंख्या घटत आहे, पण मध्यम-उच्चभ्रू लोकवस्तीच्या माहीम-दादरमध्ये कोरोना ठाण मांडून आहे.

## पालिकेचे ‘मिशन उत्तर मुंबई’

- ‘कोरोना’ रोखण्यासाठी ‘ॲण्टिजन’ चाचणी
- दोन दिवसांत ८०० टेस्ट, ४० जण ‘पॉझिटिव्ह’

**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** कोरोनाला रोखण्यासाठी पालिकेने सुरू केलेल्या ‘ॲण्टिजेन’ टेस्टला पश्चिम उपनगरात चांगला प्रतिसाद मिळत आहे. अंधेरी ते दहिसर विभागात ८०० चाचण्या करण्यात आल्या. या चाचण्यांमध्ये ४० ‘पॉझिटिव्ह’ रुग्ण आढळून आले. ‘ॲण्टिजेन’ मध्ये अर्ध्या तासाच्या आत चाचणी अहवाल मिळतो. जलद अहवाल मिळत असल्याने रुग्णांवर तातडीने उपचार करण्यात येतात.

कोरोनाची लक्षणे आढळल्यानंतर सध्या सुरु असलेल्या टेस्टनुसार अहवाल येण्यासाठी किमान २४ तासांचा वेळ लागतो आहे. या पद्धतीनुसार मुंबईत रोज सुमारे चार ते साडेचार हजार चाचण्या केल्या जात आहेत. मात्र, चाचण्यांची संख्या वाढवणे आवश्यक असल्याने १५ ते ३० मिनिटांत अहवाल देणारी ‘ॲण्टिजेन’ चाचणी सुरू करण्याचा निर्णय पालिका आयुक्त इकबालसिंग चहल यांनी घेतला आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने याला मान्यताही दिली आहे. यानुसार सध्या कोरोना झपाट्याने पसरणाऱ्या उत्तर मुंबईतील आर-दक्षिण - कांदिवली, आर उत्तर - दहिसर,




आर मध्य - बोरिवली, पी-उत्तर - मालाड आणि के-पूर्व-पश्चिम विलेपार्ले, जोगेश्वरी, अंधेरीसाठी ही चाचणी करण्यात येत असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. सध्या ‘ॲण्टिजेन’ पद्धतीसह घरोघरी जाऊन तपासणी, चाचण्यांची वाढलेली संख्या, मोबाईल व्हॅन, हेल्थ कॅपच्या माध्यमातून होणारी तपासणी यामुळे काही प्रमाणात रुग्णांची संख्या वाढलेली दिसत असली तरी मोठ्या प्रमाणात रुग्ण शोधून उपचार आणि प्रभावी ‘क्वारंटाईन’ केले जात आहे. त्यामुळे कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी याची मदत होईल, असा विश्वासही प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

पालिका रुग्णालये, प्रतिबंधित क्षेत्रातील हेल्थ कॅम्प, ‘हायरिस्क कॉन्टॅक्ट’ आणि ‘क्वारंटाईन’मधील संशयितांची चाचणी करण्यासाठी ‘ॲण्टिजेन’चाचणी करण्यात येत आहे. संशयितांच्या नाकातील स्वॅब घेऊन चाचणी केली जात आहे. यामध्ये ‘पॉझिटिव्ह’ आढळलेल्या रुग्णांची विभागणी गंभीर, अतिगंभीर आणि मध्यम अशी करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार केले जात आहेत.

‘ॲण्टिजेन’टेस्ट हायरिस्क कॉन्टॅक्टमधील लक्षणे नसलेले, मधुमेह, मूत्रपिंड विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, गरोदर माता यांची टेस्ट करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. कोरोना ‘हॉटस्पॉट’ आणि प्रतिबंधित क्षेत्रात याचा वापर परिणामकारक वापर ठरणार आहे.

SHORT TENDER NOTICE

THE MAHARASHTRA MANTRALAYA & ALLIED OFFICES CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI

Expression of interest are invited for
INTERNAL AUDITOR
from reputed firm. Those who are interested can send expression of interest on below email id within Seven days.
Email : info@mantralayacoopbank.com
Details are available on our website: www.macobank.com
Contact No. 022-22025452 / Mobile No. 9324266042

## रिक्षाचालकांची २ रुपये भाडेवाढ करण्याची मागणी



**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** ‘लॉकडाऊन’मुळे अनेक महिने बंद असलेल्या रिक्षाचालकांनी भाड्यात दोन रुपये वाढ करण्याची मागणी केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हातावर पोट असलेल्या कर्मचाऱ्यांना व नोकरदारवर्गाला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानाचा फटका बसला आहे. विशेष म्हणजे मागील तीन महिन्यांहून अधिक दिवस बंद असलेल्या वाहतूक सेवेमुळे मुंबईतील रिक्षा व टॅक्सी चालकांवर आर्थिक संकट आले आहे. या संकटावर मात करण्यासाठी व घर पुन्हा सावरण्यासाठी यांना कठीण परिस्थितीला समोरे जावे लागत आहे. सध्या राज्य सरकारने टॅक्सी-रिक्षांना परवानगी दिली आहे, परंतु, नव्याने वाहतूक सेवा देताना या रिक्षा चालकांना सामाजिक अंतर व प्रवाशांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याकरिता अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे मुंबईतील ऑटो रिक्षा युनियनने तत्काळ २ रुपये वाढ करण्याची मागणी केली आहे.

मुंबईच्या ऑटो रिक्षा युनियनने या संदर्भात राज्याचे परिवहनमंत्री अनिल परब यांना पत्र दिले आहे. रिक्षातून प्रवाशांना वाहतूक सेवा देण्यासाठी दोन प्रवाशांच्यामध्ये फायबर-ग्लास बसविण्यासाठी आर्थिक खर्च येत आहे. मार्चमध्ये ‘लॉकडाऊन’ जाहीर करण्यात आला होता. या ‘लॉकडाऊन’मुळे अनेक रिक्षाचालक एका रात्रीत बेरोजगार झाले. मात्र, आता ‘लॉकडाऊन’मध्ये शिथीलता आणल्याने बरेच स्थलांतरित कामगार परत मुंबईत आले आहेत. मात्र, जाचक अटींमुळे त्यांचा व्यवसाय तोट्यात जाणार आहे. त्यामुळे त्यांना दोन रुपये वाढ द्यावी, अशी मागणी रिक्षा युनियनने केली आहे.

### दोन दिवसांत तलावातील पाणीसाठ्यात ५१, ६८५ दशलक्ष लीटरची वाढ

**मुंबई** : मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलाव परिसरात गेल्या दोन दिवसांत चांगला पाऊस झाल्याने तलावांच्या एकूण पाणीसाठ्यामध्ये ५१,६८५ दशलक्ष लीटरची भर पडली आहे. या तलाव साठ्यातून मुंबईला दररोज सरासरी ३ हजार, ८५० दशलक्ष लीटर (३८५ कोटी लीटर) एवढा पाणीपुरवठा करण्यात येतो. ही बाब लक्षात घेतल्यास गेल्या दोन दिवसांत सुमारे १३ दिवसांच्या पाणीसाठ्याची भर पडली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणारे सात तलाव असून यापैकी पाच तलाव हे बृहन्मुंबई महापालिकेचे आहेत, दोन तलाव हे राज्यशासनाच्या अखत्यारितील आहेत. या तलावांची पाणीपातळी रोज सकाळी ६ वाजता नोंदविली जाते.

## ऑनलाईन शिक्षणासाठी ‘सह्याद्री’ऐवजी ‘जिओ’ का?

### भाजप आमदार अतुल भातखळकर यांचा राज्य सरकारला सवाल



**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** ‘‘राज्यामध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन शिक्षण व्यवस्था करताना ते केवळ रिलायन्स नेटवर्कच्या जिओ ॲपच्या माध्यमातून सुरु करण्यामागे महाविकास आघाडी सरकारचे नक्की काय काळंबेरं आहे?’’ असा सवाल भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी राज्य सरकारला केला आहे.

आ. भातखळकर यांनी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था एका खासगी कंपनीच्या माध्यमातून सुरू करणाऱ्या राज्य सरकारवर निशाणा साधत प्रश्नांची विचारणा केली आहे. ‘‘सरकारने बीएसएनएलच्या नेटवर्कच्या माध्यमातून हे वर्ग का सुरू केले नाहीत? माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बहुसंख्य शाळा या ग्रामीण भागात असताना बीएसएनएलचे नेटवर्क न वापरण्याचा निर्णय आनकलनीय आहे, दूरदर्शन सह्याद्री चॅनेलचा वापर का केला नाही? अन्य इतर खासगी कंपन्यांकडे सरकारने विचारणा केली होती का?’’ असे प्रश्न आ. भातखळकर यांनी सरकारला विचारले आहेत. ‘‘केंद्र सरकारने देशामध्ये दूरदर्शन नेटवर्कच्या माध्यमातून शिक्षणाच्या संदर्भात उपक्रम सुरू केले आहेत. राज्यातही सह्याद्री चॅनेलच्या माध्यमातून सरकार हे उपक्रम चालू करू शकले असते, परंतु शिक्षण सम्राटांशी छुपी हातमिळवणी करणाऱ्या या सरकारने खाजगी कंपन्यांची धन करण्याचा विडाच उचलला आहे असे दिसते,’’ अशी टीकाही त्यांनी केली.

‘‘जर का राज्य सरकारला जिओ ॲपच्या माध्यमातूनच शिक्षण देण्याचा इतका सोस असेल तर सीमकार्ड व डेटापॅकचा खर्च राज्य सरकारने करावा,’’ अशी मागणी ही त्यांनी केली आहे. ‘‘शिक्षकांचे पगार होत नसताना शिक्षणमंत्री स्वतःकरिता लाखो रुपयांची आलिशान गाडी घेण्यात मग्न आहेत तर मख्यमंत्री गहमंत्र्यांनी केलेल्या मलईदार बदल्या रद्द करण्यात मग्न आहेत.

राज्य शासनाच्या शुल्कवाढ न करण्याच्या शासन निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या ‘कासेगाव एज्युकेशन ट्रस्ट’ या संस्थेशी राज्य मंत्रिमंडळतील सांगली जिल्ह्यातील कोण पाटील मंत्री संबंधित आहेत, याची चौकशी करण्याची गरज आहे,’’ असेही भातखळकर यांनी म्हटले आहे. ‘‘या संदर्भात ‘मी मारल्यासारखं करतो, तू रडल्यासारख कर’ असेच घडले आहे,’’ या आरोपाचा पुनरुच्चार करून ‘‘शुल्कवाढीच्या विरोधातला वटहुकूम सरकार का काढत नाही?’’ असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public that the flat more particularly described in the scheduled hereunder written is being transferred in the name of my clients **(1) Mrs. Shilpa Suresh Pore** and (2) **Mrs. Sneha Mahendra Hajare**, being the legal heirs of **Mr. Arun Kamlakar Samel (Late Brother)** and **Mrs. Kamal Kamlakar Samel (Late Mother)**, who died intestate on 04/07/2019 and 28/05/2020, empowering them as their only legal heirs, and representatives, who are entitled to succeed to the estate of the deceased. Any person having any claim in respect thereof by way of sale exchange , gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the undersigned having office at - C/201, Gokul Heights (Agarwal Gardens) CHS Ltd., Agashi Road, Bolinj, Virar (West), Dist : Palghar-401303, Contact No.8879395923 within 14 days from the date hereof failing which, the claim or claims if any of such person or such persons will be considered to have been waived and /or abandoned and the transfer shall be completed.

**SCHEDULE ABOVE REFERRED TO**

Flat No.B/305, Third Floor, admeasuring 22.20 Square Meters, in the society known as M. Baria Pride Co-op. Hsg. Soc. Ltd., bearing Reg. No.PLR /VSI/HSG/(TC)/376/2018 dated 18.05.2018, situated at Pardi No.7, Hissa No.2, 7Part B, Opp. Post Office, Village-Agashi, Virar (West), Palghar-401301, and constructed on N.A. Land bearing Pardi No.7, Hissa No.2, admeasuring H.R. 0-09-4.

**Place: Virar (West)**
**Date: 7th July, 2020**

Sd/-
**Mr. Hemant Yagnik**
**Advocate High Court**

जाहीर नोटीस

मे. हॉटेल श्रीकृष्ण हिन्दू उपाहारगृह, एफएल-III (परवानाकक्ष) अनुज्ञप्ती क्रमांक १६६, वीर सावरकर मार्ग, विरार (पू), ता. वसई, जि. पालघर या अनुज्ञप्तीचे भागीदार कै. बिपीनचंद्र गंगाराम कदम यांचे दि. २८.०४.२०१० रोजी तसेच अनुज्ञप्तीचे दुसरे भागीदार कै. भालचंद्र गंगाराम कदम यांचे दि. २२.०६.२०१९ रोजी निधन झाल्याने त्यांचे नावे वगळून त्यांचे वारसदार मुलगे अनुक्रमे श्री. आशिष बिपीनचंद्र कदम, श्री. अमित बिपीनचंद्र कदम व श्री. मकरंद भालचंद्र कदम यांचे नावे सदर अनुज्ञप्तीमध्ये भागीदार म्हणून समाविष्ट करावयाचे असल्याने सदर प्रकरणी कुणाचा आक्षेप/हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१५) दिवसांच्या आत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालय, प्लॉट नं.११, साई सर्व्हिसजवळ, आदर्श नगर, माहीम मनोर रोड, पालघर (प.), जि. पालघर पिन- ४०१४०४ यांच्याशी आवश्यक त्या कागदपत्रांसह संपर्क साधावा.

जर का वरील मुदतीत याबाबत कोणाचाही लेखी आक्षेप आला नाही, तर सदर अनुज्ञप्तीमधून दिवंगत बिपीनचंद्र गंगाराम कदम यांचे नाव कमी करून त्यांचा वारसदार मुलगे श्री. आशिष बिपीनचंद्र कदम, श्री. अमित बिपीनचंद्र कदम तसेच दिवंगत भालचंद्र गंगाराम कदम यांचे नाव कमी करून त्यांचा वारसदार मुलगा श्री. मकरंद भालचंद्र कदम यांचे नावे समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
(डॉ. व्ही.टी. भुकन)
जिल्हाधिकारी, पालघर करिता

SKYLINE MILLARS LIMITED
CIN: L63020MH1919PLC000640
Regd. Office: Chruchgate House, 4th Floor, 32-34, Veer Nariman Road, Fort, Mumbai 400 001. Website: www.skylinemillarsltd.com,
Email: info@millars.in Tel: +91 22 22047471

NOTICE

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Tuesday, 14th July, 2020 at 2.45 p.m., through Video Conference, inter-alia, to consider and approve the Audited Financial Results of the Company for the fourth quarter and year ended 31st March, 2020.

The information contained in this notice is also available on the Company's website www.skylinemillarsltd.com and also on the website of the stock exchange viz., BSE Limited- www.bseindia.com.

For SKYLINE MILLARS LIMITED.

Date : 6th July, 2020
Place : Mumbai

Sd/-
Maulik Dave
Whole-time Director
DIN:01448536

इनोव्हासिन्थ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड
CIN: L67120MH2008PLC178923
नोंदणीकृत कार्यालयः सदनिका क्र. सी-२/३, केएमसी क्र. ९१, इनोव्हसिन्थ कॉलनी, खोपोली - ४१०२०३, महाराष्ट्र.
वेबसाईट : www.innovassynthinvestments.in | ईमेलः secretarial@innovassynthinvestments.in

दि. ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता स्वतंत्र लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

(रु. लाखात)

| अ. क्र. | तपशील | ३१.०३.२०२० रोजी संपलेले विद्यमान वर्ष | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले गत वर्ष | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले गत वर्षातील संबंधित ३ महिने |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ०.४३ | ०.४४ | - |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपूर्व) | (५४.६५) | (५४.२७) | (११.६१) |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | (५४.६५) | (५४.२७) | (११.६१) |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | (५४.६५) | (५४.२७) | (११.६१) |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | ७.१६ | (१२६.४१) | (१२६.४१) |
| ६ | सम भाग भांडवल | २४२७.८० | २४२७.८० | २४२७.८० |
| ७ | राखीव (पुनर्मुल्यांकन राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | - | - | - |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (रु. १०/- प्रत्येकी) (अखंडित आणि खंडित कार्याकरिता) | | | |
| | (अ) मूळ | (०.२०) | (०.७४) | (०.०२) |
| | (ब) सौम्यीकृत | (०.२०) | (०.७४) | (०.०२) |

टीपा :
१. वरील निष्कर्षांचे लेखापरिक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून तत्पश्चात संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ०६ जुलै, २०२० रोजी पार पडलेल्या सभेमध्ये त्यास मंजुरी देण्यात आली.
२. वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित निष्कर्षाचे विस्तृत प्रारुप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाईट www.innovassynthinvestments.in वरही उपलब्ध आहे.

इनोव्हासिन्थ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडकरिता

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६ जुलै, २०२०

जना छात्रा, व्यवस्थापकीय संचालक
उन्नीकृष्णन आंचेरी, संचालक
अभिषेक देशपांडे, कंपनी सचिव व मुख्य वित्त अधिकारी

## चीनची आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी व्हावी

### निवृत्त ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांची मागणी



**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी):** ‘‘चीनबरोबरच्या लढाईत भारताचे जेवढे नुकसान झाले नाही, त्याच्यापेक्षा अधिक नुकसान चीनने कोरोना काळात १३० कोटी भारतीयांचे केले आहे. असेच नुकसान चीनने इतर राष्ट्रांचेही केले आहे. त्यामुळे महायुद्धानंतर जसे जर्मनीला कारणीभूत मानून चौकशीला सामोरे जावे लागले, तशी चीनचीदेखील आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे,’’ अशी मागणी निवृत्त ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन व्याख्यानमालेत ‘चीनविरुद्ध हिंदुस्तान हायब्रीड युद्ध’ या विषयावर बोलताना केली.

### सावरकरांची दूरदृष्टी उपयोगी

‘‘चीनच्या नाकेबंदीसाठी सागरी सामर्थ्याच्या बाबतीत विचार केला तर अरबी समुद्रात आपला लक्षद्वीप समूह प्रभावशाली आहे. त्याशिवाय अंदमान-निकोबार बेटंदेखील भारताकडे आहेत. चीनच्या तेल आणि अन्य सामग्रीच्या निर्यातीचा मार्ग या बेटांजवळून जातो. त्यांचा हा मार्ग थांबवणे आपल्याला शक्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीदेखील ही बाब ओळखली होती आणि या बेटांवर आपले सैनिकी तळ असावेत, असे सुचवले होते. त्याचा आता उपयोग होताना दिसून येतो. भारतविरोधातील युद्धात चीन सध्याच्या काळात कधीही विजयी होऊ शकणार नाही,’’ असा विश्वसादेखील त्यांनी यावेळी बोलताना दिला.

### ‘पांढरे हत्ती पोसतोय चीन’

‘‘ ‘वन रोड वन बेल्ट’च्या माध्यमातून चीन सर्व जगासाठी ‘इंडस्ट्रियल हब’ बनू पाहत आहे. अनेक देशांची अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात ठेवण्याची त्याची मनोकामना आहे. पण, त्याचा विपरीत परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी चीनचेच नुकसान होत आहे. त्यांना काहीच परतावा मिळताना दिसून येत नाही. पाकिस्तानचेच उदाहरण आपल्याला घेता येईल. श्रीलंकेची अर्थव्यवस्था रसातळाला गेला असून व्याजदेखील देऊ शकत नाही. म्हणून त्यांनी त्यांचे बंदर ९९ वर्षांसाठी लीजवर दिले आहे. त्यामुळे हे सारे पांढरे हत्ती चीनला पोसावे लागत आहेत. बांगलादेशदेखील त्यांच्या जाळ्यात जातोय, हे आपल्यासाठी काही प्रमाणात उपयोगी आहे. कारण, त्यामुळे अनधिकृत घुसखोरी थांबायला मदत होईल. नेपाळला चीन भारतीयांच्या विरोधात कारवाई करू शकणार नाही. कारण, नेपाळला त्यासाठी अंतर्गत विरोध होणार आहे. बहुतांश जनता भारतीयांच्या बाजूने आहे. लष्करी ताकदीबाबत नेपाळ भारतापेक्षा कमजोर आहे,’’ असेही त्यांनी विश्लेषण केले.

